पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/१०२/२०२१
दिनांक : २६/०२/२०२१

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **दि.०२/०३/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा मंगळवार, दिनांक **०२/०३/२०२१** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे. ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ०९**

**दिनांक : ०२/०३/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार,** दिनांक **०२/०३/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक १६/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक **०८** ) चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेत मौजे किवळे येथील स.नं. ३९ पैकी सुमारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्र १।१२६ अन्वये टेलिकॉम सेंटर या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आलेले आहे. सदर आरक्षणासाठी संपादन संस्था दूरसंचार विभाग असून सदर विभागाने या जागेची त्यांना आवश्यकता नसल्याचे महापालिकेस कळविलेले आहे. सदर जागेच्या आरक्षणाचे प्रयोजन बदलल्यास ती जागा मनपाच्या इतर प्रयोजनासाठी उपयोगात येऊ शकते. सदर जागेला लागून आ.क्र.४ । १२४ अन्वये विभागीय कार्यालयासाठी जागा आरक्षित आहे. त्यामुळे टेलिकॉम सेंटरसाठी आरक्षित असेलेले ४०००.०० चौ.मी. क्षेत्र विभागीय कार्यालय या प्रयोजनासाठी आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यासाठी म. प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकती । सूचना अर्जाबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तद्अनुषंगिक सर्व वैधानिक प्रकिया पूर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे, यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**( उल्हास बबनराव जगताप )**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/१०२/२०२१

दिनांक : २६/०२/२०२१ चे लगत.